असा. क्र. ४०

आय-साक्थ/२०/२०००

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

### प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, मे ४, २०००/वैशाख १४, शके १९२२

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

### महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम

अनुक्रमणिका

पृष्ठे

सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९.—कारागृहे अधिनियम, १८९४ महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम .. २४९–२५०

दिनांक ३ मे, २००० रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रतिमा उमरजी,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ४ मे, २००० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम).

### कारागृहे अधिनियम, १८९४ महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

१८९४ चा अधि. क्र. ९. ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, कारागृहे अधिनियम, १८९४ हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे, त्याअर्थी, भारताच्या गणराज्याच्या एक्कावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, कारागृहे (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २००० असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १८९४ चा अधि- नियम क्रमांक ९ याच्या कलम ३१ ची सुधारणा.

२. कारागृहे अधिनियम, १८९४ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केला आहे) हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ३१ ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"३१. **विवक्षित कैद्यांचा खाजगी रीत्या निर्वाह.**—(१) सिद्धदोष नसलेल्या फौजदारी कैद्याला, तपासणी होण्याच्या आणि महानिरीक्षक मान्य करील अशा नियमांच्या अधीन राहून, स्वत:चा निर्वाह करण्याची आणि योग्य वेळी खाजगी रीत्या कपडे आणि अंथरुण-पांघरुण खरेदी करण्याची किंवा स्वीकारण्याची परवानगी दिली जाईल :

परंतु, जर असा कैदी हा ज्यास सत्याग्रहामध्ये (अहिंसक सार्वजनिक आंदोलनात) भाग घेतल्यामुळे कोठडीत पाठविण्यात आलेले आहे असा सत्याग्रही असेल तर त्यास तपासणी होण्याच्या आणि राज्य शासनाच्या मान्यतेने कारागृह महानिरीक्षकाकडून करण्यात आलेल्या नियमांच्या अधीन राहून स्वत:चा निर्वाह करण्याची आणि योग्य वेळी खाजगी रीत्या अन्न, कपडे, अंथरुण-पांघरुण किंवा इतर गरजेच्या वस्तू खरेदी करण्याची किंवा स्वीकारण्याची परवानगी दिली जाईल.

(२) दिवाणी कैद्याला, तपासणी होण्याच्या आणि कारागृह महानिरीक्षक मान्य करील अशा नियमांच्या अधीन राहून, स्वत:चा निर्वाह करण्याची आणि योग्य वेळी खाजगी रीत्या अन्न, कपडे, अंथरुण-पांघरुण किंवा इतर गरजेच्या वस्तू खरेदी करण्याची किंवा स्वीकारण्याची परवानगी दिली जाईल.".

सन १८९४ चा अधि- नियम क्रमांक ९ याच्या कलम ३२ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ३२ मध्ये, "कोणत्याही दिवाणी कैद्याचे" या शब्दांनी सुरु होणाऱ्या व "गरजेच्या वस्तू" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"कोणत्याही सिद्धदोष नसलेल्या फौजदारी कैद्याचे कपडे व अंथरुण-पांघरुण यांचा कोणताही भाग आणि ज्यास सत्याग्रहामध्ये (अहिंसक सार्वजनिक आंदोलनात) भाग घेतल्यामुळे कोठडीत पाठविण्यात आलेले असेल असा सत्याग्रही असलेल्या कोणत्याही दिवाणी कैद्याचे किंवा सिद्धदोष नसलेल्या फौजदारी कैद्याचे अन्न, कपडे, अंथरुण-पांघरुण किंवा इतर गरजेच्या वस्तू".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई